# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र. - ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in

No. : विकाऔ/ITCell/DBT Training/2017/ 3166

Date : 22nd Aug 2017

प्रति,

प्राचार्य / संचालक,

या विभागांतर्गत सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्था

विद्यापीठ विभाग

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलकरिता ओरिएन्टेशन / प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेबाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते कि शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाराष्ट्र शासनाद्वारे नव्याने सुरु करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल / MahaDBT Portal वर (**www.mahadbt.gov.in**) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे मार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहेत.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व

३) उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

महाडीबीटी पोर्टल व उपरोक्त योजनेचे सुधारित नियम, अटी व शर्तींची सविस्तर माहिती या विभागांतर्गत येणा-या सर्व संस्थांना देण्याच्या अनुषंगाने दि. ०१-०९-२०१७ (शुक्रवार) रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबादच्या प्रेक्षागृहात (ऑडीटोरीयम) मध्ये सकाळी १०.०० वाजेपासून एक दिवसीय ओरिएन्टेशन / प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई येथील अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. सदरील प्रशिक्षणाकरिता संस्थेचे प्राचार्य व शिष्यवृत्ती ई. प्रकरणांची काम हाताळणारे कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

ह्या कार्यक्रमात केंद्र शासनाच्या NSP पोर्टलवरील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता असलेले केंद्र शासनाच्या गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजनेची माहिती देखील देण्यात येईल.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी संबंधित कर्माचा-यासह सदरील प्रशिक्षणास वेळेवर तसेच संपूर्ण संपेपर्यंत उपस्थित राहावे.

(महेश शिवणकर)

प्र. सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

औरंगाबाद

प्रत: मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीस्तव सादर.